# शाळेतली भुताटकी

सकाळी आईने एक हाक मारली की पटकन उठणं, मग वेळ न काढता चटपट आवरणं हे कधी रैनाला जमलंच नाही. रोज काही ना काहीतरी गडबड व्हायचीच. कधी आंघोळ उशीरा व्हायची तर कधी सॅकमधे पुस्तकं भरायला वेळच नसायचा.

आज ही तसंच झालं.

रैनाने कितीही पटापट आवरलं तरी तिला शाळेत जायला आता उशीर होणारंच होता.

सकाळी बरोब्बर आठ वाजून दहा मिनिटांनी तिची स्कूल बस येते.

आठ वाजले तरी रैनाची आंघोळ व्हायची होती.

त्यातच,‘ तुला हे करायला नको, तुला ते करायला नको आणि सांगितलेलं अजिबात ऐकायला नको’ अशी आईची आरती सतत सुरू होतीच.

आता ऊशीर झाल्याने शाळेत मार खावा लागेल त्यापेक्षा.. प्रेमळ भुताला बोलावलेलं बरं, असा रैनाने विचार केला.

रैना दाराच्या पाठीमागे लपली.

रैनाने डाव्या हाताची मूठ घट्ट बंद केली.

उजव्या हाताच्या तळहातावर डाव्या हाताची मूठ ठेवली.

उजव्या हाताच्या चार बोटांनी ही मूठ पकडली पण अंगठा मात्र सरळ ठेवला.

मग डोळे बंद करुन मुठीमधे तीन वेळा फुंक मारत,

दोन वेळा हळूच म्हणाली,‘प्रेऽऽऽमळ भूऽऽत.. .. प्रेऽऽऽमळ भूऽऽत’

त्याक्षणी रैनाच्या मानेवर कुणीतरी हलकेच फूंक मारली.. आणि खिशिफिशी हसत प्रेमळ भूत म्हणालं,“बोल रैना काय मदत करू? तुझी शाळा नदीत नेऊन ठेवू? की तुमच्याशी शाळेत खेळायला वाघ, सिंह पाठवू?”

“असलं काही नको रे भुता.

अरे तू पाहतो आहेस ना.. मला ऊशीर होतोय.. मला मदत कर.. आणि..” रैनाच्या मनातलं प्रेमळ भुताला सगळं कळलं.

“ओके..बोके..पक्के.. काम शंभर टक्के” प्रेमळ भूत खुसफूसलं.

पाचच मिनीटात रैनाची स्कुल बस आली आणि तिथेच बंद पडली.

ड्रायव्हरने खूप प्रयत्न केले पण गाडी सुरूच होईना.

ड्रायव्हरने सगळ्या गोष्टी तपासल्या, तर त्या ठाकठीक!

पण त्याला कळेना, ही गाडी सुरु का होत नाही?

ड्रायव्हर वैतागून तसाच बसून राहिला.

स्कुल बस पाहताच आई रैनाला ओरडू लागली,“चल आटप लवकर.”

पण रैनाने अजिबात घाई गडबड केली नाही. तिने सावकाश आवरलं.

आणि ती बस जवळ गेली.

रैना बसमधे चढताच बस आपोआप सुरु झाली.

रैनाची सॅक हवेत तरंगत हलकेच वर गेली.

रैनाला कळलं,सॅकमधे प्रेमळ भूत बसलं आहे.

रैना मनातल्या मनात प्रेमळ भुताला म्हणालि,“तू शाळेत नको येऊस. तिथे वर्गातल्या सरांचं तुला ऐकावंच लागतं. ते सांगतील त्याप्रमाणे तुला करावं लागेल.”

प्रेमळ भूत गयावया करत म्हणालं,“येतो ना गं प्लीज. मी सरांनी सांगितलेलं सगळं-सगळं ऐकीन. ते सांगतील ते सारं मी निमूटपणे करीन. आणि जेव्हा हवी तेव्हा तुला मी मदत पण करीन. आता तरी ‘हो’ म्हण.”

हे ऐकल्यावर रैनाने आनंदाने मान डोलावली आणि प्रेमळ भूत जाम खूश झालं.

बस बिघडली असल्याने शाळेत पोहोचायला ऊशीर होईल असं वाटलं होतं.

पण बस सुरु होताच ड्रायव्हरला चक्कर आली. तो स्टिअरींगवर आडवा पडला.

रैना सोडून सर्व मुलांना गाढ झोप लागली. काही मुलं तर तोंड उघडं ठेवून ढार्रSSS ढूर्रSSS घोरु लागली.

आणि त्याक्षणी..

बस हवेत ऊंच-ऊंच उडाली.

बसच्या आजूबाजूला असणारी माणसं तोंडाचा आSSSS करुन पाहू लागली. पण एका क्षणात बस अगदी पार ढगांच्याही वर गेली.

आकाशातून तरंगत पण विमानाच्या वेगाने बस शाळेजवळ पोहोचली.

बस शाळेच्या मैदानात हलकेच उतरली.

मग ड्रायव्हरला व झोपलेल्या मुलांना जाग आली. त्यांनी डोळे चोळत समोर पाहिलं तर शाळा! कुणालाच काही कळलं नाही.

सगळी मुले वेळेवर वर्गात गेली.

शाळा सुरु झाली.

जोशी सर वर्गात आले.

सगळी मुले उठून उभी राहिली.

पाठोपाठ रैनाची सॅकपण हवेत ऊंच गेली.

सरांनी मानेनेंच बसण्याची खूण केली. पण ही खूण प्रेमळ भुताने काहि पाहिली नाही.

सगळी मुले बसली पण सॅक मात्र हवेतच तरंगत राहिली.

'सरांनी आपल्याला काही बसायला सांगितलं नाही' असं समजून प्रेमळ भूत हवेतल्या हवेत उभंच होतं.

हवेत तरंगणारी सॅक पाहून सर दचकले.

पण हसत-हसत रैनाने पटकन सॅक खाली ओढली.

आज भूगोलाचा तास होता.

हवामान व पाऊस असा विषय होता.

तास सुरु होताच नेहमीप्रमाणे मुलांनी काहीतरी गडबड करायला सुरुवात केली.

सर वैतागून म्हणाले,"आधी मी सांगतो ते ऐका.. समजलंय..?"

प्रेमळ भुताला वाटलं आता सर जे जे सांगतील ते ते ऐकलं पाहिजे.

प्रेमळ भूताने नकळत 'हो-हो' करत मान हलवली आणि त्याक्षणी सगळ्या मुलांच्या माना ही तशाच 'हो-हो' करत हलल्या.

सर खूश झाले.

सर म्हणाले,"समुद्राचं पाणी कडकडीत तापलं की समुद्राच्या पाण्याची वाफ होते आणि ती आकाशात जाते."

त्याक्षणी खिडकीतून गरमागरम वाफेचे लोटच्या लोट वर्गात येऊ लागले.

वर्गातलं वातावरण एकदम गरम झालं. सरांना व मुलांना वाफेचे चटके बसू लागले.

सरांच्या व मुलांच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. सगळेच घामाने चिंब्ब भिजले.

मुले घाबरली.

त्यांनी खिडक्या बंद करण्याचा प्रयत्न केला, पण छे!
खिडक्या बंदच होईनात.
त्यातून भसाभस वाफेचे लोट वर्गात येतच राहिले.
मुलींनी चटकन उठून पटकन वर्गाचा दरवाजा उघडला. पण छे!
वाफ काही वर्गाच्या बाहेर जाईचना. वाफ वर्गातच गरगरत राहिली.

सर संशयानेच या विचित्र वाफेकडे पाहू लागले तर मुले हा प्रकार पाहून चक्रावली.

जरा घाबरुनच सर म्हणाले,"याच वाफेचे ढग बनतात."

आणि काय चमत्कार..
वर्गातल्या वाफेचे मोठमोठे काळे-करडे जड-जड ढग, वर्गातच तरंगू लागले.

हे जाडजुड ढग वर्गात इकडे तिकडे सावकाश फिरु लागले. जोशी सरांच्या व मुलांच्या डोक्यावर मोठमोठाले ढग तरंगू लागले.
या मोठाल्या काळ्याकुट्ट ढगांमुळे वर्गात चांगलंच अंधारुन आलं.
मुले आनंदाने आरडा ओरडा करत किंचाळू लागली.. ढगांना हात लावू लागली.
बाकावर उभं राहून उड्या मारत, मुले ढगात जाऊन बाहेर येऊ लागली.
मुले हातांनी ढग इकडे तिकडे जोरजोरात ढकलू लागली.
ढगांची आदळापट सुरु झाल्याने मधेच विजा चमकू लागल्या.

सरांना कळेना हा काय प्रकार सुरु आहे?
जोशी सरांनी घाबरत थरथरत विचारलं,"इथे काही भुताटकी तर नाही ना?"

त्याक्षणी वर्गात ढगांचा गडगडाट होऊ लागला.
एक ढग हसत-हसत गडगडला, "होऽऽऽ आहे भुताटकी.. पण प्रेमळ भुताटकी.."
सरांचे पाय लटपटू लागले.
त्यांच्य हाता-पायाला कंप सुटला.
जीभ तोंडात लडबडू लागली.

मुले आनंदाने किंचाळत म्हणाली,"सर शिकवाऽऽ.. पुढे बोलाऽऽ.."

जोशी सर थरथरत कसंबसं म्हणाले,"या ढगांना गार हवा लागली की.."

आणि त्याक्षणी..
वर्गात गार हवा वाहू लागली.
वाऱ्याचा वेग वाढला.
गारवा अंगाला झोंबू लागला.
ढग गरागरा फिरु लागले.
विजांचा चमचमाट व ढगांचा गडगडाट सुरू झाला.
ढग वेगवगळे आकार घेऊन वर्गात वरती नाचू लागले.
हे पाहून मुले चेकाळली.
धमाल आरडओरडा करू लागली.

जोशी सरांना चक्कर येऊ लागली.
त्यांनी एका डोळ्याने ढगांकडे पाहात दोन हातांनी डोकं दाबून धरलं.
‘आज वर्गात हे असं कसं होतंय’ तेच त्यांना कळेना.

बाकावर चढून नाचत मुले ओरडली,“सर शिकवा.. पुढे बोला..”

सर लडबडत कसंबसं म्हणाले,“ढगांना गार हवा लागली की मग पाऊस पडतो.. ..”

आणि त्याक्षणी मात्र..
वर्गात मुसळधार पाऊस पडू लागला.
वर्गात धो-धो पाऊस कोसळू लागला.

वर्गात मुलांच्या कंबरेपर्यंत पाणी तुंबलं.
वर्गाचा दरवाजा उघडा असूनही पाणी काही बाहेर जाईना.
मुले बाकावर उभं राहून खाली पाण्यात उड्या मारु लागली.
मुले वर्गातल्या पाण्यात डुंबू लागली. पावसात नाचू लागली.
एकमेकांच्या अंगावर पाणी उडवू लागली.
मुलांच्या वह्या, पुस्तकं आणि सॅक वर्गात तरंगू लागल्या.

जोशी सरांना कापरं भरलं.
त्यांची पँट भिजली. शर्ट भिजला.
हातातले पुस्तक भिजले.

इतक्यात पावसाचा जोर वाढला..

आता वर्गातली टेबल खूर्चि पाण्यावर तरंगू लागली होती.
मुलांची लाकडी बाकं बाजूला तरंगत जाऊन वर्गात मधोमध हौद तयार झाला होता.
या वर्गातल्या हौदात मुले धुमाकुळ घालत होती.
मुले पोहत होती.
तरंगत होती.
डुबक्या मारत होती.
एकमेकांना पाण्यात ढकलत होती.
एकमेकांच्या अंगावर चढून पाण्यात उड्या मारत होती.
आरडाओरडा करत होती.
काहिजणं पाण्यावर आडवं पडून फटाफटा पाय आपटत, इतरांवर फताफता पाणी उडवत होती.
सगळा 'पाणीगोंधळ' वर्गात सुरू होता.
पावसात भिजत आणि पाण्यात डुंबत मुले म्हणाली,"सर शिकवा.. पुढे बोला.."

जोशी सरांची भीतीने बोबडी वळली होती.
तरी ते पुटपुटले,"पाऊस पडल्यावर गवत उगवतं..झाडं उगवतात.."

त्याक्षणी वर्गात गवत उगवू लागलं.
चिकूची, आंब्याची, सफरचंदाची, जांभळाची, डाळींबांची छोटी-छोटी झाडं वर्गात उगवली.
झाडं उगवताच झाडांना फळं आली.
पाठोपाठ काही रंगीबेरंगी पक्षी आले. झाडावर बसून किलबिलाट करू लागले.

आता मुले झाडांतून पळू लागली.
झाडांतून वाट काढत पोहू लागली.
झाडावर चढून छोटे चिकू, छोटे आंबे खाऊ लागली.
पक्षांसारखं ओरडु लागली.
पाण्यात तुफान दंगा मस्ती करू लागली.
वर्गात धमाल कल्ला सुरु झाल होता.

जोशी सर तर घाबरून एका झाडामागे लपून बसले होते.
हे काय चाललंय तेच त्यांना कळत नव्हतं.

इतक्यात लांबून मुख्याध्यापकांचा आवाज ऐकू आला,"काSSSय दंगा चाललाय त्या वर्गात..?"

जोशी सर पाण्यातच उभे होते तरी त्यांच्या तोंडचं पाणी पळालं!
त्यांचे पाय आणखीन जोरात लटलटू लागले.
'आता मुख्याध्यापकांना काय सांगायचं' या कल्पनेनेच त्यांना भोंवळ येऊ लागली.

रैना प्रेमळ भुताला म्हणाली,"अरे आम्हा मुलांना पहिल्यासारखं नीट कर. नाहीतर मुख्याध्यापक आमची धुलाई करतील."

"ओके..बोके..पक्के.. काम शंभर टक्के" प्रेमळ भूत खुसफूसलं.

एका क्षणात..
वर्गातली झाडं व गवत गायब झालं.
पाणी उडून गेलं.
टेबल, खुर्ची व बाकं जागेवर आली.
मुले चक्कं कोरडी झाली.
मुलांच्या वह्या, पुस्तकं व सॅक एकदम कोरड्या ठणठणीत.
फक्त..
जोशी सर चिंब भिजलेले होते.

इतक्यात रागीट मुख्याध्यापक वर्गात आले.
त्यांनी पाहिलं तर..
सगळी मुले शांत बसलेली पण..
जोशी सर मात्र पूर्ण भिजलेले.
त्यांच्या अंगावरुन थपाथपा पाणी गळत होतं. ते थंडीने कुडकुडत होते.

मुख्याध्यापक भडकले. रागाने लालेलाल झाले.

ते सरांवर गुरकावत म्हणाले,"तुम्ही वर्गात मुलांना शिकवता की त्यांच्या समोर आंघोळ करत बसता?तुम्ही असे थपथपून भिजलात कसे? वर्गात काय करता काय?"

जोशी सर भीतभीत म्हणाले,"अहो मुख्याध्यापक, मी जलचक्र शिकवत असताना आधी वर्गात गरमागरम वाफ आली.

मग त्या वाफेचे काळे-काळे जाडजूड ढग झाले.
हे ढग वर्गात फिरु लागले.
म्हणजे मुलेच बाकावर ऊभं राहुन ढगांना ढकलु लागलि..फिरवू लागली.
तेंव्हाच अचानक वर्गात गार हवा वाहू लागली.
त्या ढगांना ही गार हवा लागली.

त्यातून पाउस पडला.
अहो मुख्याध्यापक त्याच पावसात मी भिजलो हो. खरंच."

मुख्याध्यापक जोरात ओरडले,"मला काय मूर्ख समजता का? तुमच्या काहीपण थापा ऐकून घ्यायला मी का येडा आहे का? काय समजता काय तुम्ही मला?"
मग ते सावकाश चालत जोशी सरांच्या जवळ गेले.
त्यांच्या डोळ्यात काही वेडाची झांक दिसते का, ते पाहू लागले.

जोशी सरांच्या ओल्या पाठीवरुन हात फिरवत मुख्याध्यापक म्हणाले,"अं.. वर्गात ढग आले आणि पाऊस पडला..
तुमच्याच वर्गात पाऊस पडला..
अच्छा अच्छा..
मग काय झालं हो जोशी सर, तो पाऊस पडल्यावर..?"

जोशी सर थरथरत म्हणाले,"वर्गात झाडं उगवली..
झाडांना फळं लागली
झाडांवर पक्षी आले.
ते सुंदर किलबिलाट करु लागले."

हे ऐकताच मुख्याध्यापक जोशी सरांकडे पाहात खो खो.. ठो ठो.. हसू लागले.
मोठमोठ्याने हसू लागले.
त्यांना आपलं हसणं थांबवताच येईना.

इतक्यात अचानक..
छतातून दहा नळ एकदम सुटल्याप्रमाणे मुख्याध्यापकांच्याच डोक्यावर बदाबदा पाच बादल्या रंगीत पाणी पडलं.
तरी पण त्यांची फक्त पँटच भिजली..
शर्ट मात्र सुकाच!!
मुख्याध्यापक दचकून छताकडे पाहु लागले.
त्यांच्या पँटीतून टपाटपा पाणी गळत होतं.
ते घाबरुन भिजलेल्या पँटिकडे पाहू लागले.

आणि कशी कुणास ठाऊक, पण त्याचवेळी..
शाळेची घंटा जोरजोरात वाजली.

शाळा सुटली.

मुले पळाली.

घरी जाताना रैनाने भुताला विचारलं,
“काय रे, तू आम्हा सर्वांना कोरडं केलंस,
मग सरांना का नाही केलंस?”

“अगं तू मला काय सांगितलं होतंस ते आठव ना..”
प्रेमळ भुताने असं म्हणताच,
रैनाला आपली चूक कळली.

“नंतर तू त्या मुख्याध्यापकांना का भिजवलंस रे?”
यावर खिशिफीशी हसत भूत म्हणालं,
“अगं नाहितर..
आपल्या बिचाऱ्या जोशी सरांना.. .. ..”

आणि रैना सारं समजली.

---

मुलांनो,
प्रेमळ भुताचं हे वाक्यं तुम्ही पुरं करू शकाल?

आणि
तुमच्या वर्गात तुम्हाला
‘त्याने’ मदत केलीच पाहिजे,
असं खरंच तुम्हाला वाटतंय?

न भीता भुताला कळवा.
त्याला इमेल करा.
प्रेमळ भूत तुमच्या इमेलची नेहमीच वाट पाहात असतं.

प्रेमळ भूत फक्त मुलांच्याच इमेलला उत्तर देतं.
कारण
प्रेमळ भूताला कोण आवडतं हे तुम्हाला माहितच आहे.

लक्षात ठेवा,
‘ओके..बोके..पक्के
तर काम शंभर टक्के.’

---

– राजीव तांबे.
premalbhoot@gmail.com